तेरणातीर

सोमवार दि.२८ मार्च २०२२



# पर्यावरण व नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन करणे ही काळाची गरज-गजानन भोपणीकर

देवणी(प्रतिनिधी): पर्यावरण व नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन ही काळाची गरज असून त्या दृष्टीने सर्वांनी एकत्रित येऊन प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे. श्रमप्रतिष्ठा, नैतिक मूल्यांची जोपासना, सुदृढ व सक्षम युवकांची जडणघड रासेयो शिबिराच्या माध्यमातून होत असते असे प्रतिपादन जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठान भोपणीचे सचिव गजानन भोपणीकर यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व कै. रसिका महाविद्यालय देवणी यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजीनगर (बोरोळ) ता. देवणी येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत पर्यावरण व नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संवर्धन व स्वच्छ भारत अभियाना साठी युवक-युवती शिबिराचे आयोजन शिवाजीनगर (बोरोळ) येथे करण्यात आले आहे.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बोरोळचे सरपंच श्री. ज्ञानेश्वर शेंडगे उपस्थित होते. मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच अशोकराव देशमुख, डॉ. नारायण भोसले, तंटामुक्ती अध्यक्ष व्यंकटराव देवने, प्राचार्य डॉ.चंद्रकांत जावळे, ग्रामपंचायत सदस्य कमलाकर बालुरे,गोविंद शेंडगे, विठ्ठल बालूरे, राम हुरुचनाळे, जीवन बालूरे, शेषराव बालूरे, मधुकर बालूरे, संभाजी बालूरे, बाबुराव शेंडगे,राजकुमार बालूरे, विठ्ठल सूर्यवंशी, दिगंबर बालूरे, लक्ष्मण बालूरे, संजय शेंडगे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे यांनी केले. यावेळी श्री. अशोकराव देशमुख, डॉ. नारायण भोसले, श्री राहुल बालूरे यांनी उपस्थित शिबिरार्थी विद्यार्थी व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच मा. श्री. ज्ञानेश्वर शेंडगे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर संपन्न करण्यासाठी ग्रामस्थांच्या वतीने सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांना सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के व कु. शिवानी पाटील यांनी केले. प्रा. डॉ. प्रशांत भंडे यांनी राष्ट्रीय सेवा योजना गीताचे सादरीकरण केले. रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. गोपाल सोमाणी यांनी आभार व्यक्त केले. या कार्यक्रमास डॉ.विजयकुमार मोरे, डॉ.पुरुषोत्तम मोरे, प्रा.महादेव टेंकाळे, डॉ. सुलोचना डेंगाळे, डॉ.रेणुका कुनाळे, डॉ.वैशाली चटगे, डॉ.सचिन चामले, प्रा.अंकुश भास्कर, श्री.संतोष मुळे ग्रामस्थ व शिबिरार्थी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कासार शिरसी येथे ि

कासार शिरसी(प्रतिनिधी): या परिसरात सोमवार तारीख २१ रोजी तिथीनुसार शिवजयंती जन्मोत्सव सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तीन दिवस चाललेल्या या जन्मोत्सवाची सांगता कासारशिरसी येथे संभाजीनगर येथील महाराष्ट्र भूषण शिवशाहीर सुरेश जाधव व सहकारी यांच्या पोवाड्याच्या माध्यमातून करण्यात आली.

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा या पोवाड्यासह फटाक्यांच्या आतीषबाजीत श्री छत्रपती

# हूलसूर ग्रामपंचायतीवर भाजपाचे व

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
कै रसिका महाविद्यालय देवणी

Principal
Kal. Rasika Mahavidyalaya
Deoni Dist. Latur